# एम. आय. एम. एस. आर. वैद्यकीय महाविद्यालय व

## यशवंतराव चव्हाण ग्रामीण रूग्णालय, विश्वनाथपूरम लातूर

## रूग्णाचा अधिकार ( Citizens Charter in Vernacular Language i.e. Marathi )

- जात /धर्म यांचा विचार न करता उपलब्ध उत्तम उपचार मिळणे. तसेच जीवरक्षक प्रणालीचे उपचार आर्थिक परिस्थितीचा विचार न करता मिळण्याचा अधिकार.

- डॉक्टर निवडण्याचा अधिकार.

- आदरपूर्वक उपचार मिळण्याचा अधिकार.

- उपचार स्वीकारण्याचा तसेच नाकारण्याचा अधिकार तसेच पूर्ण माहिती घेउन निर्णय घेण्याचा अधिकार.

- हॉस्पीटलमधील डॉक्टरांसह सर्व स्तरातील कर्मचा—याकडून आदरपूर्वक तसेच कोणताही भेदभाव न करता उपचार मिळण्याचा अधिकार.

- दुस—या डॉक्टरांचे मत घेण्याचा अधिकार. रूग्ण निर्णय घेण्याच्या परिस्थितीत नसल्यास रूग्णाचे पालक /कायदेशीर प्रतिनिधी यांना निर्णय घेण्याचा अधिकार.

- रूग्णाच्या सेवेशी निगडीत व्यक्तींचे नाव जाणून घेण्याचा तसेच उपचाराबाबत शंका विचारण्याचा अधिकार.

- स्वत:च्या वैद्यकीय उपचारांची कागदपत्रे जाणून घेण्याचा तसेच त्याची प्रत मिळण्याचा अधिकार.

- हॉस्पीटल तसेच सेवा पुरण्याच्या व्यक्तींबद्दलच्या तक्रारींची योग्य दखल घेतली जाण्याचा अधिकार.

- वैद्यकीयदृष्टया आवश्यक नसलेली बंधने नाकारण्याचा अधिकार.

- आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता केल्यानंतर वैद्यकीय सल्ल्याविरूध्द् हॉस्पीटल सोडण्याचा अधिकार.

- कोणत्याही संशोधन अभ्यास प्रकल्पात सहभागी होण्यापूर्वी माहिती पूर्वक संमतीचा अधिकार.

- बिलाचा अंदाज तसेच तपशील मिळण्याचा अधिकार.

## रूग्णांच्या जबाबदाऱ्या

- हॉस्पिटलशी प्रामाणिक रहाणे. उपचारकर्त्या व्यक्तींना तुमचा वैद्यकीय पूर्व इतिहास तसेच सद्यस्थितीची माहिती देणे.
- उपचार अथवा दिलेल्या सूचनांबद्दल शंका असल्यास हॉस्पीटल वा उपचारकर्त्यांना सांगणे.
- हॉस्पीटल कर्मचाऱ्यांशी प्रक्षोभक वर्तन न करणे शाब्दिक /शारीरिक गैरवर्तन न करणे.
- हॉस्पिटलच्या सर्व नियमांचे पालन करणे.
- उपचारासंबंधीच्या निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होणे तसेच त्याबाबतचे शंका निरसन करून घेणे.
- इतर रूग्ण तसेच हॉस्पिटल कर्मचाऱ्यांच्या अधिकारांचा आदर राखणे.
- हॉस्पिटलने सांगितलेल्या उपचार नियमावलीचे पालन करणे.
- उपचारांसाठीच्या बिलांची पूर्तता तत्परतेने करणे.
- वैयक्तिक गोष्टी/मौल्यवान वस्तूंची जबाबदारी पूर्णपणे रूग्ण/नातेबाईकांवर राहील.